फॉर्म अ.क्र.............

| | |
|---|---|
| अर्जाचा कार्यालयीन आवक नोंदणी क्रमांक | |
| दिनांक | |

उमेदवारांनी स्वत:चे अलीकडील स्वसाक्षांकित छायाचित्र चिकटवावे.

# कोतवाल पदासाठी अर्जाचा नमुना

प्रति,

मा.तहसिलदार तथा सदस्य सचिव,

तालुका निवड समिती ,लातूर ता. जि. लातूर

विषय -: कोतवाल पदासाठी अर्ज.

महोदय

आपल्या कार्यालयातील जहिरात क्रमांक..........................................................................ला अनुसरुन कोतवाल पदासाठी अर्ज करीत असून माझा तपशील खालील प्रमाणे अहे.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | अर्जदाराचे संपूर्ण नाव -: | | आडनाव | नाव | वडीलांचे/पतीचे नाव |
| | | मराठी मध्ये | | | |
| | | इंग्रजी मध्ये | | | |
| 2 | अर्जदाराची मुळ जात व प्रवर्ग | | | | |
| 3 | अर्जदाराने अर्ज सादर केलेला प्रवर्ग (अनु.जाती/ / वि.जा.(अ)/ भ. ज. (ड)/ वि.मा.प्र. /इ.मा.व./आ.दु.घ./अराखीव) | | | | |
| 4 | महिला आरक्षणातून अर्ज सादर केला आहे किंवा नाही (असल्यास प्रवर्ग नमूद करावा) | | | | |
| 5 | अर्जदाराचा जन्म दिनांक | | | | |
| | | | दिवस | महिना | वर्ष |
| 6 | अर्जदाराचे दि.31 जुलै 2023 रोजीचे वय | | | | |
| | | | दिवस | महिना | वर्ष |
| 7 | अर्जदार यांचे मुळ रहिवाशी गावाचे नाव | | गाव--------------- ता.------------------- | | |
| 8 | दूरध्वनी क्रमांक/मोबाईल क्रमांक | | | | |
| 9 | अर्जदाराचा पत्रव्यवहाराचा संपुर्ण पत्ता | | | | |
| 10 | अर्जदार महाराष्ट्राचा रहिवाशी आहे काय? (होय/नाही) | | | | |
| 11 | लिंग (पुरुष/स्त्री) | | | | |
| 12 | उमेदवार विवाहित आहे किंवा नाही? (होय/नाही) | | | | |

Scanned with CamScanner

13. अर्जदाराची शैक्षणिक पात्रता -:

| अ. क्र. | शैक्षणिक पात्रता | शाळा/महाविद्यालय/विद्यापीठ | उत्तीर्ण वर्ष | एकूण गुण | प्राप्त गुण | गुणांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

परिक्षा शुल्क भरणा तपशील -:

| बँकेचे नाव | बँक शाखा | डी.डी.क्रमांक | दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|---|
| | | | | |

14. अर्जा सोबत जोडावयाची कागदपत्रे -: रकान्यामध्ये (होय/नाही) नमूद करावे.

| | | |
|---|---|---|
| 1 | तहसिलदार लातूर यांनी दिलेले रहिवासी प्रमाणपत्र | |
| 2 | वयाचा पुरावा (शाळा सोडल्याचा दाखला/10 वी सनद/जन्म दाखला इत्यादी) | |
| 3 | शैक्षणिक अर्हतेचा पुरावा | |
| 4 | जात प्रमाणपत्र (मागासवर्गीय उमेदवार असल्यास) | |
| 5 | जात वैधता प्रमाणपत्र (मागासवर्गीय उमेदवार असल्यास) | |
| 6 | उन्नत/प्रगत गटात मोडत नसल्या बाबतचे प्रमाणपत्र **(इतर मागास प्रवर्ग व विमुक्त जाती (अ) करीता)** /आ.दु घ प्रमाणपत्र | |
| 7 | लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र | |
| 8 | परिक्षा शुल्क (राष्ट्रीयकृत बँकेचा डी.डी.) | |
| 9 | हॉल तिकीट पाठवण्याकरीता खुला लिफाफा, सदर लिफफ्यावर उमेदवाराचा संपुर्ण पत्ता व तिकीट लावण्यात यावे. | |

मी सत्य कथन करतो/करते की, वर नमूद केलेली सर्व माहिती बरोबर आहे. सदरील माहिती खोटी आढळल्यास माझी नियुक्ती कोणत्याही टप्प्यावर रद्द होण्यास मी पात्र राहील.

**दिनांक -:**

**ठिकाण -:**

तहसील कार्यालय, लातूर ता.जि.लातूर

उमेदवाराची स्वाक्षरी

(उमेदवाराचे संपूर्ण नाव)

Scanned with CamScanner

**महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम 2005 नुसार**
**अर्जा सोबत जोडावयाच्या लहान कुटुंबाच्या प्रतिज्ञापनाचा नमुना**
**प्रतिज्ञापन**
**नमुना-अ**
**(नियम-4 पहा)**

मी श्री/श्रीमती/कुमारी.........................................................................................................................

श्री .................................................................................................... यांचा /यांचीमुलगा/मुलगी/पत्नी, वय .............. वर्षे, राहणार.................................................................... याव्दारे पुढील प्रमाणे जाहिर करतो/करते की,

1. मी ...................................................................................................... या पदासाठी माझा अर्ज दाखल केला आहे.

2. आज रोजी मला ......................... ( संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक 28 मार्च 2005 नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ........................... आहे.

3. हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक 28 मार्च 2005 व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईन, याची मला जाणीव आहे.

**ठिकाण -:**

**दिनांक -:**

**(उमेदवाराची सही)**

## तालुका निवड समिती लातूर जि.लातूर
## कोतवाल पदांची सरळसेवा भरती निवड प्रक्रीया-2023
## जाहिरात क्रमांक-2023/आस्थापना/कोतवाल-भरती/कावि-351 दि.21.07.2023

महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक-केआरटी-2012/**प्र.क्र.432/ई-10**, दिनांक 05 **सप्टेंबर**, 2013 व महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक-संकीर्ण-2023/**प्र.क्र.17/ई-10**, दिनांक **17 मे**, 2023 व शासन निर्णय पीकेए/1059/VI-L बॉम्बे सरकार सचिवालय, बॉम्बे दिनांक 07 **मे**, 1959, कोतवाल सेवा प्रवेश नियमानुसार कोतवाल पदे भरती करणेबाबत मा.जिल्हाधिकारी लातूर यांचे पत्र क्र.2023/आस्था/कक्ष-5/कावी-517 दि.20 **जूलै**, 2023 आदेशान्वये, तहसिलदार लातूर यांचे आस्थापनेवरील अवर्गीकृत कोतवाल संवर्गातील मा.विभागीय आयुक्त (मावक) यांचे बिंदू नामावली तपासणी अहवाल क्रमांक 2023/मावक/कक्ष-1/सिआ-204 दिनांक 18.07.2023 नुसार रिक्त पदे भरण्या करीता, खालील प्रमाणे नमूद प्रवर्गनिहाय पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

**कोतवाल संवर्गातील आरक्षित पदसंख्या खालील प्रमाणे.**
**(मासिक एकत्रित मानधन रुपये 15000/-) (एकूण पदसंख्या)**

| अ.क्र. | जातीचा प्रवर्ग | महिला | समांतर आरक्षणा शिवाय भरावयाची पदे | एकूण भरावयाची पदे |
|---|---|---|---|---|
| 1 | अनुसुचित जाती | 01 | 01 | 02 |
| 2 | विमुक्त जाती (अ) | 00 | 01 | 01 |
| 3 | भटक्या जमाती - ड | 00 | 01 | 01 |
| 4 | विशेष मागास प्रवर्ग | 00 | 01 | 01 |
| 5 | इतर मागास प्रवर्ग | 00 | 01 | 01 |
| 6 | आर्थिक दृष्टया दुर्बल घटक | 01 | 01 | 02 |
| 7 | अराखीव | 02 | 05 | 07 |
| | एकूण | 04 | 11 | 15 |

**टिप** -: 1. पदांच्या एकूण संख्येमध्ये व आरक्षणात वाढ किंवा घट होण्याची शक्यता आहे.
2. महिलांसाठी 30% आरक्षीत पदांवर माहिला उमेदवार न मिळाल्यास महिला व बाल विकास विभाग यांचे शासन निर्णय दिनांक 25/05/2001 अन्वये त्या त्या प्रवर्गातील पुरुष उमेदवारांमधुन सदर पदे भरण्यात येतील.

**अटी व शर्ती**

1. **शैक्षणिक अर्हता**
   अ) उमेदवार किमान 4 थी उत्तीर्ण
   आ) उमेदवारास मराठी भाषा लिहिता व वाचता येणे आवश्यक आहे.
2. **वयोमर्यादा**
   अ) उमेदवाराचे वय दिनांक 31 **जुलै**, 2023 **रोजी** 18 **ते** 40 वर्षेया दरम्यान असावे.
   आ) कोतवाल हे पद वर्ग-चार संवर्गात मोडत नाही व सदरील पद हे अवर्गीकृत असल्यामुळे अपंग, प्रकल्पग्रस्त/भुकंपग्रस्त, अशंकालीन, खेळाडू, माजी सैनिक इत्यादीसाठी आरक्षण कोतवाल भरतीसाठी लागू असणार नाही.
3. उमेदवार लातूर तालुक्यातील रहिवाशी असणे आवश्यक आहे. तसेच अर्जासोबत महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र व लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
4. निवड झालेल्या उमेदवारांनी शारीरीक क्षमतेबाबतचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करावे लागेल व चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र सादर करावे लागेल.
5. या जाहिराती अन्वये करण्यात येणारी भरती संपूर्ण तालुका हा एक घटक गृहित धरुन करण्यात येत असल्यामुळे निवड होणा-या उमेदवारांच्या नियुक्तीसाठी त्यांच्या राहण्याच्या ठिकाणाचा कोणताही विचार न करता, तालुका अंतर्गत रिक्त असलेल्या कोणत्याही ठिकाणी पदस्थापना देण्यात येईल व तालुका अंतर्गत बदलीस पात्र राहतील, त्याकरीता उमेदवाराने रुपये 100 चे स्टॅम्प पेपरवरील बंधपत्र देणे आवश्यक आहे.
6. उमेदवारांची नियुक्ती केवळ तातपुरत्या स्वरुपाची राहील.

तहसील कार्यालय, लातूर
ता.जि.लातूर

Scanned with CamScanner

7. कोतवाल हे पद अवर्गीकृत असल्यामुळे सेवानिवृत्ती विषयक लाभ मिळणार नाहीत.
8. मागासवर्गीय उमेदवारांनी समक्ष अधिकारी यांनी दिलेले जात प्रमाणपत्र अंतीम निवडीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील. निवड होणा-या मागासवर्गीय घटकातील उमेदवारांना महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक 2011/प्र.क्र./1064/2011/16-ब दिनांक 12 डिसेंबर 2011 अन्वये संबधीत उमेदवारांच्या जातवैधता प्रमाणपत्राच्या आधिन राहून तातपुरती नियुक्ती दिली जाईल. जातवैधता प्रमाणपत्र सहा महिन्याच्या आत सादर करण्याच्या अटीवर बंधपत्र/शपथपत्र लिहून दिल्यानंतर विहीत मुदतीत जातवैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. विहीत मुदतीत जातवैधता प्रमाणपत्र सादर न केलेल्या उमेदवारांची सेवा संपुष्टात येईल.
9. अनुसुचित जाती/अनुसुचित जमाती वगळून अन्य प्रवर्गातील मागासवर्गीय उमेदवारांसाठी चालू आर्थिक वर्षाचे उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतच्या प्रमाणपत्राची छायांकित प्रत साक्षांकित करुन आवेदन पत्रासोबत जोडावी. (नॉन-क्रिमीलेअर चे तत्व अनुसुचित जाती/अनुसुचित जमाती या प्रवर्गा व्यतिरीक्त अन्य सर्व मागास प्रवर्गांना लागू राहील.)
10. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील उमेदवारांकरीता सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक राआधो-4019/प्र.क्र.31/16-अ, दिनांक 12 फेब्रुवारी 2019 व दिनांक 31 मे, 2021 अन्वये विहीत करण्यात आलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

11. **महिला उमेदवारांना करीता**

अ) महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय दिनांक 04 मे, 2023 अन्वये खुल्या प्रवर्गातील महिलांकरीता आरक्षित असलेल्या पदावरील निवडी करीता नॉनक्रिमीलेअर सादर करण्याची आवश्यकता नाही.

आ) अनुसचित जाती व अनुसुचित जमाती वगळता अन्य मागास प्रवर्गातील महिलांकरीता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीसाठी दावा करु इच्छिणा-या महिलांना त्या त्या मागास प्रवर्गातील इतर मागस व बहुजन कल्याण विभाग, तसेच सामान्य प्रशासन विभागा कडून वेळोवेळी विहीत करण्यात आल्याप्रमाणे नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

12. **परिक्षा शुल्क**

अ) **मागासवर्गीय आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक उमेदवाराकरीता रुपये** 400/-

आ) **खुल्या प्रवर्गातील उमेदवाराकरीता रुपये** 500/-

इ) **परिक्षा शुल्क ना-परतावा (Non-Refundable) आहे.**

वरील प्रमाणे परिक्षा शुल्क **"तहसिलदार लातूर"** या नावे राष्ट्रीयकृत बँकेचा डी.डी. (डिमांड ड्राफ्ट) अर्जासोबत सादर करावा. (परिक्षा शुल्क बँक प्रोसेसिंग चार्जेस, तसेच त्यावरील देय कर वगळून आहेत.)

13. **निवड पध्दती**

अ) महसूल व वन विभाग, शासन निर्णय दि.17 **मे** 2023 नुसार 100 गुणांची लेखी परिक्षा घेण्यात येईल.

आ) लेखी परिक्षा दि.20 **ऑगस्ट** 2023 रोजी **दुपारी** 12.30 **ते** 02.00 या वेळेत, प्रवेश पत्राव्दारे कळविण्यात आलेल्या ठिकाणी घेण्यात येईल.

इ) गुणवत्ता क्रम हा लेखी परिक्षेत मिळलेल्या गुणांच्या आधारे म्हणजेच एकूण 100 पैकी मिळालेल्या गुणांच्या आधारावर असेल.

ई) लेखी परिक्षेतील प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ 50 प्रश्न बहुपर्यायी स्वरुपाची असेल.

उ) लेखी परिक्षेत सामान्य ज्ञान, अंक गणित, मराठी भाषा विषय व जिल्ह्यातील भौगोलिक माहिती याचा समावेश राहिल.

ऊ) लेखी परिक्षेत मिळवलेल्या गुणांच्या आधारे उमेदवारांच्या मुळ कागदपत्रांची पडताळणी केल्यानंतर अंतिम निवड यादी प्रसिध्द करण्यात येईल.

ऋ) समसमान गुण असल्यास शासन निर्णय दि.27 जून, 2008 नुसार कार्यवाही अनुसरण्यात येईल.

ऌ) निवड करण्यात आलेले उमेदवार निवड झालेल्या दिनांकापासून 07 दिवसांच्या आत रुजू न झाल्यास प्रतिक्षा यादीतील दुस-या क्रमांकावरील उमेदवार यांची नियुक्ती करण्यात येईल.

14. **अर्ज कसा करावा**

तहसील कार्यालय, लातूर ता.जि.लातूर

Scanned with CamScanner

अ) सदर पदासाठी करावयाच्या अर्जाचा नमूना तहसिल कार्यालय लातूर येथे रुपये 25/- शुल्क भरुन उपलब्ध करुन देण्यात येईल, तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संकेतस्थळावर केवळ पाहण्यासाठी (https://www.latur.gov.in) उपलब्ध करण्यात आलेला आहे.

आ) जाहिराती सोबत प्रसिध्द करण्यात येत असलेला विहीत नमुन्यातील अर्ज त्यामधील माहिती/तपशील सुस्पष्टपणे नमूद करुन सादर करावा.

इ) अर्जा सोबत स्वत:चे नाव व पत्ता नमूद केलेला व रु. 5 /- चे पोस्टाचे तिकिट लावलेला खुला लिफाफा जोडावा.

ई) उमेदवाराने त्यांचे अलिकडील काळातील छायाचित्र आवेदन पत्रावर दर्शविलेल्या जागी स्वसाक्षांकित करुन घट्ट चिटकवावे.

उ) महाराष्ट्र राज्याचे अधिवास (Domicile) प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे.

ऊ) शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्राच्या साक्षांकित केलेल्या प्रति अर्जासोबत जोडाव्यात.

ऋ) शाळा सोडल्याचा दाखला किंवा बोनाफाईड प्रमाणपत्र

ऌ) अर्जा सोबत जातीच्या प्रमाणपत्राची साक्षांकित केलेली प्रत जोडावी.

ऍ) उमेदवार मागासवर्गीय असल्यास त्यांची जात प्रवर्गाचे मुळ जात प्रमाणपत्र तपासणीचे वेळी सादर करणे बंधनकारक राहील. तसेच शासन निर्णय क्रमांक बी.सी.सी.2011/प्र.क्र.1064/2011/16 ब दिनांक.12/12/2011 अन्वये उपस्थित उमेदवाराच्या जात वैधता प्रमाणपत्राच्या अधिन राहून जात वैधता प्रमाणपत्र सहा (6) महिण्याच्या आत सादर करावयाच्या अटीवर बंधपत्र/ शपथपत्र लिहून घेतल्यानंतर विहीत मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

ऎ) अनुसुचित जाती/अनुसुचित जमाती व्यतिरीक्त सर्व मागास प्रवर्गातील उमेदवारांनी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे चालू आर्थिक वर्षातील नॉनक्रिमिलेअर प्रमाणपत्राची साक्षांकित केलेली प्रत अर्जा सोबत जोडावी.

ए) आर्थिक दुर्बल घटक प्रवर्गात (EWS) अर्ज सादर करणा-या उमेदवाराने तहसिलदार यांचे राज्य शासनाचे विहीत नमुन्यातील (EWS) प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील (31 मार्च 2024) पर्यंत वैध असलेले)

ऐ) लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र

15. **अर्ज स्विकृतीची अंतिम तारीख व कार्यालयाचा पत्ता**

अ) उमेदवारांनी विहीत नमून्यातील अर्ज सहपत्रांसह तहसिल कार्यालय लातूर येथे समक्ष दिनांक.31 जुलै,2023 पर्यंत (सार्वजनिक सुट्टीचे दिवस वगळून) कार्यालयीन वेळेत दाखल करावेत.

आ) विहीत केलेल्या मुदतीनंतर प्राप्त होणा-या अर्जाचा विचार केला जाणार नाही व त्यासाठी हे कार्यालय जबाबदार राहणार नाही, तसेच या संबधाने उमेदवारांसमवेत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही, याची गांभीर्य पूर्वक दखल घ्यावी.

16. विहीत नमून्यात नसलेले अर्ज, विहीत शुल्क भरणा न केलल्या उमेदवारांचा अर्ज, शैक्षणिक अर्हता धारण न करणा-या उमेदवारांचा अर्ज, अपूर्ण व चुकीच्या पध्दतीने भरलेले अर्ज, फोटो नसलेला व स्वसांक्षांकित न केलेला अर्ज आणि विहीत मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्ज, स्वतःचा पत्ता नमुद केलेला खुला लिफाफा नसलेला अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत व त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

17. या जाहिरातीला अनुसरुन ज्या उमेदवारांचे अर्ज विहीत कालावधतील प्राप्त होतील, केवळ अशाच उमेदवारांचे अर्ज विचारात घेतले जातील. अन्य कोणत्याही संदर्भातील त्यापूर्वी शासन, जिल्हाधिकारी कार्यालय, उपविभागीय अधिकारी कार्यालय किंवा तहसिल कार्यालयास प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

18. अर्जा सोबत कुठल्याही राजकीय पक्षाचे शिफरस पत्र जोडलेले नसावे, अन्यथा सदरील अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.

19. प्राप्त झालेल्या अर्जाच्या छाननी अंती पात्र/अपात्र उमेदवारांची यादी तहसिल कार्यालय लातूर , येथील नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यात येईल, पात्र उमेदवारांना परिक्षेचे स्थळ व वेळ प्रवेश पत्राव्दारे लेखी स्वरुपात कळविण्यात येईल.

20. लेखी परिक्षेसाठी उपस्थित राहणा-या उमेदवारांनी प्रवेश पत्रावरील दिलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

तहसील कार्यालय, लातूर
सत्यमेव जयते
ता.जि.लातूर

Scanned with CamScanner

21. ज्या उमेदवारांना पोस्टाने प्रवेशपत्र प्राप्त झाले नाहीत, अशा उमेदवारांनी ठरवून दिलेल्या कालावधीत तहसिल कार्यालय लातूर येथे समक्ष उपस्थित राहून स्वत:चे प्रवेशपत्र प्राप्त करुन घ्यावीत.

22. **उत्तर तालिका**

अ) प्राथमिक व अंतिम उत्तर तालिका तहसिल कार्यालय लातूर, येथील नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यात येईल.

23. लेखी परिक्षेचा निकाल उमेदवारांच्या आसन क्रमांक निहाय तहसिल कार्यालय लातूर व उपविभागीय अधिकारी कार्यालय लातूर यांच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यात येईल.

24. अंतिम निवड झालेल्या उमेदवारांच्या मुळ कागदपत्रांची पडताळणी उपविभागीय अधिकारी कार्यालय लातूर येथे होईल. कागदपत्र पडताळणी नंतरच अंतिम निवड यादी तहसिल कार्यालय लातूर व उपविभागीय अधिकारी कार्यालय लातूर येथील नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यात येईल. मुळ कागदपत्रांच्या पडताळणी नंतर उमेदवाराची निवड वैद्य समजण्यात येईल.

25. यापूर्वी जिल्हाधिकारी कार्यालय, उपविभागीय अधिकारी कार्यालय, तहसिल कार्यालय यांचेकडे अर्ज सादर केला असेल तरीही सदर उपरोक्त जाहिरातीच्या अनुषंगाने नव्याने विहित मुदतीत अर्ज करणे आवश्यक राहील.

26. **कोतवाल भरतीचा कालबध्द कार्यक्रम खालील प्रमाणे आहे.**

| अ.क्र. | बाब | कालावधी (दिनांक) | वेळ | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| 1 | अर्ज विक्री व स्विकृती | दि.24/07/2023 ते दि.31/07/2023 (सार्वजनिक सुट्टीचे दिवस वगळून) | कार्यालयीन वेळेत | तहसिल कार्यालय लातूर |
| 2 | लेखी परिक्षेसाठी पात्र/ अपात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे | दि.07/08/2023 | कार्यालयीन वेळेत | 1. तहसिल कार्यालय लातूर<br>2. उपविभागीय अधिकारी कार्यालय, लातूर<br>3. जिल्हाधिकारी कार्यालयाचे अधिकृत संकेतस्थळावर (https://www.latur.gov.in) |
| 3 | ज्यांना प्रवेश पत्र पोष्टाने प्राप्त झाले नाहीत, अशा उमेदवारांना तहसिल कार्यालयातून प्रवेश पत्र देणे | दि.17/08/2023 व दि. 18/08/2023 | कार्यालयीन वेळेत | तहसिल कार्यालय लातूर |
| 4 | लेखी परिक्षा | दि. 20/08/2023 | दुपारी 12.30 ते 02.00 | प्रवेश पत्राव्दारे पोष्टाने कळविण्यात येईल. |
| 5 | प्राथमिक उत्तर तालिका प्रसिध्द करणे | दिनांक.20/08/2023 | सायंकाळी 06.00 वाजेपर्यंत | 1. तहसिल कार्यालय लातूर<br>2. उपविभागीय अधिकारी कार्यालय, लातूर<br>3. जिल्हाधिकारी कार्यालयाचे अधिकृत संकेतस्थळावर (https:// www.latur.gov.in) |
| 6 | प्राथमिक उत्तर तालिका प्रसिध्द झाल्यानंतर त्यावर काही आक्षेप/ हरकती असल्यास त्या सादर करणे | दिनांक.21/08/2023 | सायंकाळी 06.00 वाजेपर्यंत | तहसिल कार्यालय लातूर |

तहसील कार्यालय, लातूर ता.जि.लातूर

Scanned with CamScanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 7 | अंतिम उत्तर तालिका प्रसिध्द करणे व उमेदवारांना मिळालेला गुणांचा तक्ता प्रसिध्द करणे | दिनांक.22/08/2023 | कार्यालयीन वेळेत | 1. तहसिल कार्यालय लातूर<br>2. उपविभागीय अधिकारी कार्यालय, लातूर<br>3. जिल्हाधिकारी कार्यालयाचे अधिकृत संकेतस्थळावर (https:// www.latur.gov.in) |
| 8 | लेखी परिक्षेतील गुणवत्ताक्रमानुसार पात्र उमेदवारांची अटी व शर्तींच्या अधिन राहून तात्पुरती यादी प्रसिध्द करणे | दिनांक.23/08/2023 | कार्यालयीन वेळेत | 1. तहसिल कार्यालय लातूर<br>2.उपविभागीय अधिकारी कार्यालय, लातूर<br>3.जिल्हाधिकारी कार्यालयाचे अधिकृत संकेतस्थळावर (https:// www.latur.gov.in) |
| 9 | मुळ कागदपत्रांची पडताळणी | दि.24/08/2023 | कार्यालयीन वेळेत | उपविभागीय अधिकारी कार्यालय लातूर |
| 10 | अंतिम निवड यादी प्रसिध्द करणे | दिनांक.25/08/2023 | कार्यालयीन वेळेत | 1. तहसिल कार्यालय लातूर<br>2. उपविभागीय अधिकारी कार्यालय, लातूर<br>3. जिल्हाधिकारी कार्यालयाचे अधिकृत संकेतस्थळावर (https:// www.latur.gov.in) |

27. पोस्टाने पाठविलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

28. काही प्रशासकीय अथवा तांत्रिक अडचण उद्भवल्यास निवड प्रक्रीया स्थगित अथवा रद्द करण्याचे संपूर्ण अधिकार निवड समितीस राहतील.

29. उमेदवाराने उमेदवारीच्या संदर्भात कोणत्याही प्रकारची शिफारस अथवा दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्याला अपात्र ठरवून, त्याला अपात्र ठरवून उमेदवारी भरती प्रक्रीयेच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

30. अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारण केली, लेखी परिक्षेस बोलविले याचा अर्थ नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे, असे नाही.

31. लेखी परिक्षेसाठी उपस्थित राहण्याचा प्रवास खर्च उमेदवारांनी स्वत: करावा लागेल.

32. जाहिरीतामधील काही मुद्दे शासन निर्णयाच्या विसंगत असल्यास शासन निर्णय अंतिम राहील.

33. वरील अटी व शर्ती नियमा व्यतिरीक्त वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश व निर्णय लागू राहतील.

34. सदर जाहिरात विस्तृत व सविस्तरपणे व अर्जाचा नमूना तहसिल कार्यालय लातूर, पंचायत समिती लातूर, उपविभागीय अधिकारी कार्यालय, लातूर येथील नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यात आलेला आहे.

35. सदर जाहिरात विस्तृत व सविस्तरपणे व व अर्जाचा नमूना (https://www.latur.gov.in) या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

36. वरील नमूद जाहिराती मध्ये काहीही बदल झाल्यास त्याबाबतची माहिती तहसिल कार्यालय लातूर येथील नोटीस बोर्डवर, तसेच मा. जिल्हाधिकारी कार्यालय लातूर यांचे (https:// www.latur.gov.in) या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

**दिनांक :** 21//07/2023

**स्थळ : लातूर**

| | |
|---|---|
| **सदस्य सचिव तालुका निवड समिती तथा तहसीलदार, लातूर** | **अध्यक्ष तालुका निवड समिती तथा उपविभागीय अधिकारी, लातूर** |

तहसील कार्यालय, लातूर
ता.जि.लातूर

Scanned with CamScanner